नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग

निशाणी क्र.३८ वरील आदेश.
दिनांक २१/०६/२०२४.

आरोपीच्या वकीलांनी दुपारी ०३.३० वाजता उलटतपास तहकुबीचा अर्ज दिला. साक्षीदार नामे सय्यद अहेमद सय्यद महेबुब, सय्यद रिजवान सय्यद सादक धैारी, तसेच साक्षीदार क्र.२ सय्यद अजर हे सकाळी ११.०० वाजल्यापासुन न्यायालयात हजर आहेत. आरोपींना त्यांच्या वकीलांना हजर करण्यास सांगण्यात आले. त्यावेळी वकील एका तासानी येणार असा निरोप दिला. परंतु, मध्यान्हतराची वेळ होऊनही आरोपीचे वकील हजर झाले नाही. त्यांनी दिलेलया अर्जाचे अवलोकन केले असता ते उलटतपास घेण्यास का असमर्थ आहेत. यासंबंधी कोणतेही कारण दिलेले नाही. आरोपीच्या वकीलांनी मौखीक युक्तीवाद केला की, त्यांना साक्षीदारांचे बयाण तसेच इतर कागदपत्र याचा अभ्यास करावा लागेल. महत्वपुर्ण असे की, प्रकरण हे सन २०२० सालचे असुन सुरुवातीपासुनच विधीज्ञ श्री.एस.झेड.काझी या प्रकरणाचे काम बघतात. दिनांक २०/०१/२०२३ रोजी साक्षीदाराचे बयाण झाले. तेंव्हापासुन साक्षीदार सय्यद अजर याचा उलटतपास आजतागायत प्रलंबित आहे. त्यामुळे आरोपीच्या वकीलांनी केलेला युक्तीवाद निरर्थक आहे. उशीरा हजर होऊन उशीरा प्रकरण तहकुबीचा अर्ज देण्यात आला. यावरुन आरोपीतर्फे केवळ प्रकरण प्रलंबित करण्यासाठीचे प्रयत्न सुरु असल्याचे दिसुन येते. असे असले तरीही एक शेवटची संधी म्हणुन आरोपीचा अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येतो.

आदेश.

१. अर्ज रक्कम रुपये ४०००/- साक्षीदार भत्यावर मंजुर करण्यात येतो.

२. दोन्ही साक्षीदारांना प्रत्येकी दोन हजार रुपये साक्षीभत्ता आरोपीने दयावा.

३. आरोपी व साक्षीदारांनी पुढील तारखेस न चुकता सकाळच्या सत्रात हजर राहुन उलटतपास पुर्ण करण्याचे आहे.

४. पुढील तारखेस साक्षीभत्ता देणे हे उलटतपास घेण्याची पुर्वअट आहे.

Sd/-
(एस.ए.हरणे)
दिनांक: २१.०६.२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.